जाहिर प्रकटन

पुणे महानगरपालिका

समाज विकास विभाग

"सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षात पुणे महानगरपालिका हद्दीत ज्येष्ठ नागरिक व एकल महिलांसाठी विनामुल्य कायदेशीर साहाय्य प्रकल्प राबविण्यासाठी इच्छुक असणाऱ्या सामाजिक काम करणाऱ्या नोंदणीकृत संस्थांकडून स्वारस्य अभिव्यक्ती सूचना (EOI-Expression of Interest) मागविणेस"

पुणे महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना,उपक्रम,प्रकल्प, कार्यक्रम इत्यादी राबविणेत येतात.पुणे महानगरपालिका हद्दीत ज्येष्ठ नागरिक व एकल महिलांसाठी विनामुल्य कायदेशीर साहाय्य प्रकल्प अशासकीय/सामाजिक/स्वयंसेवी संस्था व पुणे महानगरपालिका समाज विकास विभाग यांच्या संयुक्त सहकार्याने राबविणे आहे.याकरिता सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संस्थांकडून प्रस्ताव मागविणेत येत आहे.

महाराष्ट्र शासन, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांचे दि.१०/०८/२०२६ रोजीच्या पत्रानुसार पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकल महिलांचे सर्वेक्षण करावयाचे आहे. याकरीता एकल महिलांचे नोंदणी करीता खात्यामार्फत पोर्टल उपलब्ध करून देणेत येईल. तसेच सर्व एकल महिलांना निमंत्रित करण्यात येवून त्यांच्या समस्या, अडचणी तसेच शासनाकडून अपेक्षित उपाययोजनांबाबत चर्चा आयोजित करावयाची आहे. महिलांनी उभारलेल्या यशस्वी उपक्रमांची माहिती देऊन त्यांचा प्रेरणादायी संवाद आयोजित करावयाचा आहे. रोजगार, स्वयंरोजगार व उद्यमशीलता संधीबाबत मार्गदर्शन करावयाचे आहे. बचत गटामध्ये नसलेल्या महिलांना बचत गटांशी जोडण्यासाठी विशेष प्रयत्न करावयाचे आहे. स्त्री-पुरुष समानता, सन्मान व सामाजिक प्रतिष्ठा याबाबत जनजागृती करावयाची आहे. महिलांसाठी आवशकतेनुसार समुपदेशन व सहाय्य सुविधा उपलब्ध करून द्यावयाचे आहे. संस्थानी खात्याकडे कामाचे सादरीकरण सादर करणे आवश्यक आहे. खात्याच्या सूचनांनुसार काम करणे बंधनकारक राहील.

संस्थांनी प्रस्ताव सादर करताना प्रस्तावासोबत पुराव्याकरीता खालील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.

१. संस्थेचे नाव, संस्था चालक स्वतंत्र व्यक्ती आहे वा संचालक मंडळ आहे,

२. संस्थेचे रजिस्ट्रेशन क्रमांक व दिनांक,

३. संस्थेचे कार्यकारणी अहवाल,

४. संस्थेचे मागील तीन वर्षांचे ऑडिट अहवाल रिपोर्ट,

५. स्वयंसेवी संस्थेचे चालू असलेले प्रकल्प

६. मागील किमान तीन वर्ष या क्षेत्रात काम केल्याचा अनुभव कागदपत्रे

सर्व कागदपत्रांवर अनुक्रमांकासहीत, संस्था चालकांची स्वाक्षरी, शिक्का व तारीख टाकणेत यावी.

तरी अशा प्रकारे संयुक्त प्रकल्प म्हणून चालविण्यास स्वारस्य असलेल्या पुणे शहरातील संस्थांनी आपले प्रस्ताव दि.३१/०८/२०२६ ते दि.१५/०९/२०२६ पर्यंत कार्यालयीन दिवशी व वेळेत खालील ठिकाणी जमा करावेत. मागील किमान तीन वर्ष या क्षेत्रात काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्राप्त होणारे प्रस्ताव कोणतेही कारण न देता नाकारण्याचे पूर्ण अधिकार मा. उप आयुक्त, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका यांनी राखून ठेवलेले आहेत.

अर्ज जमा करणे व अधिक माहिती करीता संपर्काचे ठिकाण-

समाज विकास विभाग,

तळमजला, मुख्य इमारत,

मनपा भवन, शिवाजीनगर, पुणे – ०५

०२०-२५५०१२८३

सही/-

उप आयुक्त

समाज विकास विभाग

पुणे महानगरपालिका

सदरची माहिती pmc.gov.in या संकेतस्थळावर E.O.I सदराखाली दि.१५/०९/२०२६ पर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे.